वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि. ९ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# सोलापुरकरांचे पुन्हा वादग्रस्त वक्तव्य

Email.- dailydivyawarta@Gmail.com

# दिव्य वार्ता

Email.-editordivyawarta@gmail.com

## नाशिकमधील छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड आक्रमक

### सोलापूरकरांच्या प्रतिमेला मारले जोडे!



सोलापुर, (दिव्य न्युज):- औरंगजेबाच्या तावडीतून सुटण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांनी लाच दिली होती, असं विधान अभिनेता राहुल सोलापूरकर याने केलं होतं. सोलापूरकर याच्या या विधानावरून राज्यभरात पडसाद उमटले होते. सोलापूरकरचा निषेध म्हणून राज्यभरात अनेक ठिकाणी मोर्चे, आंदोलनं करण्यात आले. सर्वच राजकीय पक्षांनीही सोलापूरकर याच्या विधानाचा निषेधही नोंदवला होता. तर छत्रपती उदयनराजे भोसले यांनी सोलापूरकरला गोळ्या घालण्याची भाषा केलेली होती. हा वाद अजूनही थांबलेला नसताच सोलापूरकर याने आणखी एक वादग्रस्त विधान केलं आहे. वेदांनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ब्राह्मणच होते, असा जावई शोध राहुल सोलापूरकर याने लावला आहे. सोलापूरकर याने नवीन वादग्रस्त विधान करून पुन्हा एक वाद ओढवून घेतला आहे.

रामजी सपकाळ यांच्या एका बहुजनाच्या घरात जन्माला आलेले एक भिमराव की जो आंबावडेकर नावाच्या एका गुरुजीकडून दत्तक घेतला जातो. त्याच नावावरून पुढे भिमराव आंबेडकर म्हणून मोठे होतात. त्यांनी प्रचंड अभ्यास केल्यामुळे वेदांमध्ये जस म्हटलं आहे, तसं ते अभ्यास करून मोठे झाले आहेत त्या आर्थाने वेदांमध्ये भीमराव आंबेडकर ब्राह्मण ठरतात असं वादग्रस्त वक्तव्य राहुल सोलापूरकर याने केलं आहे.

### नाशिकमध्ये सोलापुरकरांच्या फोटोला जोडे मारो

वादग्रस्त अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी वादग्रस्त विधान केले होते. त्यामुळे त्यांच्या विरोधात वातावरण चांगलेच पेटले आहे. नाशिकमध्ये याबाबत विविध पक्ष आणि संघटनांनी आंदोलन करून कारवाईची मागणी केली आहे.अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी जाणीवपूर्वक बहुजन समाज आणि महाराष्ट्राच्या भावना दुखावण्यासाठी असे विधान केले आहे. एका मुलाखतीत त्यांनी हे वादग्रस्त आणि निषेधार्य विधान केले. हे करताना त्यांची देहबोली विचारात घेतल्यास ते सर्व जाणीवपूर्वक करीत असल्याचे स्पष्ट होते, असा आरोप आंदोलकांनी केला आहे.यासंदर्भात छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड अतिशय आक्रमक झाली आहे. या संघटनेच्या मुस्लिम समाजाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी काल आंदोलन केले. यावेळी त्यांनी भद्रकाली परिसरात राहुल सोलापूरकर यांच्या फोटोला जोडे मारण्यात आले. नाशिक शहरात देखील आंदोलन झाले.

# लोकसहभागाच्या काठीचा आधार घेत सायमा टाकतेय एक-एक पाऊल

## आवाहनाला प्रतिसाद,दानशूरांनी १ लाख ३५ हजाराची केली मदत




पाटोदा, (दिव्य न्युज):- उपचाराअभावी अंपगत्व आलेल्या सायमा बेग हिच्यावर पुणे येथील संचेती हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असुन तिच्या प्रकृतीमध्ये चांगला सुधार होत आहे.सायमाचे वडील हे सालगडी असुन त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने योग्य उपचार करू न शकल्याने सायमाला अंपगत्व आले होते.ही गंभीर बाब लक्षात येताच सय्यद शफाउद्दीन तसेच पत्रकार हमीदखान पठाण, जावेद शेख यांनी

▶▶ पान २ वर



# बेपत्ता ट्रकचालकाचा आढळला मृतदेह







नेकनूर , (दिव्य न्युज):- बीड तालुक्यातील मांजरसुंभा परिसरात धुळे-सोलापूर महामार्गावरील भारत रसाळ यांच्या शेतात तीन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या मोहम्मद सलीम (वय ५५, रा. गुलबर्गा, .

पान २ वर

# सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीला आ.संदीप क्षीरसागर आले धावून!

## हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी तत्काळ मुदतवाढ द्यावी



बीड, (दिव्य न्युज):- बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ऐनवेळी आ.संदीप क्षीरसागर धावून आले आहेत. मतदारसंघासह जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीनच्या खरेदीसाठी नाफेडकडे नावनोंदणी केली, मात्र मुदत संपल्यानंतर आता ही खरेदी कधी होणार? असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत असून शासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करत हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी तत्काळ मुदतवाढी द्यावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पणण मंत्री जयकुमार रावल व राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे केली

▶▶ पान २ वर

### सुरेश धसांचा बीड हत्या प्रकरणात नवा सनसणाटी आरोप

# कृष्णा आंधळे सायको

## पोलिसांच्या कामगिरीला लागलेला कलंक आहे-आ.धस

बीड , (दिव्य न्युज):- मस्साजोगचे संतोष देशमुख यांच्या हत्येला दोन महिने उलटून गेले तरीही या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी कृष्णा आंधळे अद्याप फरार आहे. आंधळेला पकडण्यात पोलिसांना यश आलेलं नाही. त्यामुळे पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात आहे.

मात्र, पोलिसांवर आपला पूर्ण विश्वास असून ते लवकरच आंधळेला पकडतील असं म्हणत भाजप आमदार सुरेश धस यांनी कृष्णा आंधळे बाबत मोठा गौप्यस्फोट केला आहे. आंधळे हा सायको किलर असून पोलिस भरतीची करत असतानाच तो गुन्हेगार झाल्याचं त्यांनी सांगितलं आहे.माध्यमांशी संवाद साधताना सुरेश धस म्हणाले, संतोष

▶▶ पान २ वर



# विधान परिषदेच्या ३३% जागा अद्याप रिकाम्याच

## सध्याची सभागृहाची परिस्थिती काय?

मुंबई , (दिव्य न्युज):- महाराष्ट्र विधान परिषदेचे एकूण संख्याबळ ७८ इतके आहे, त्यातील २६ जागा आजमितीस रिक्त आहेत. हे ज्येष्ठांचे सभागृह ३३ टक्के रिकामे असल्याचे चित्र सध्यातरी बदलण्याची शक्यता नाही.

विक्रांत पाटील, चित्रा वाघ, बाबूसिंग राठोड (भाजप), हेमंत पाटील, मनीषा कायंदे (शिंदेसेना), पंकज भुजबळ, इद्रिस नायकवाडी (अजित पवार गट) अशा सातजणांना राज्यपाल नियुक्त ▶▶ पान २ वर

# जयंत पाटील भाजपच्या संपर्कात?



मुंबई , (दिव्य न्युज):-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मंत्रिमंडळात १ जागा रिकामी असल्याचं सूचक वक्तव्य केलं होतं. त्यानंतर महाविकास आघाडीतील दिग्गज नेता महायुतीत सहभागी होण्याची चर्चा रंगली होती. त्यातच आता जयंत पाटलांच्या आग्रहावरुन नितीन गडकरी हे राजाराम बापू शिक्षण संस्थेतील विकास कामांच्या भुमीपूजनासाठी सांगलीत येणार आहेत.. त्यामुळे जयंत पाटील भाजपाच्या संपर्कात असल्याची चर्चा रंगलीय. जयंत पाटील राष्ट्रवादी का सोडू शकतात ते पाहूयात.

आर आर आबांनंतर जयंत पाटलांनी राष्ट्रवादीच्या वाढीसाठी मोठं योगदान दिलं. मात्र २०१९ मध्ये जयंत पाटील आणि अजित पवार यांच्यात सुप्त संघर्ष रंगला होता. त्यामुळे जयंत पाटील हे २०१९ मध्येच भाजपसोबत जाण्याची चर्चा रंगली होती. मात्र अजित पवारांनी बंड केलं आणि त्यासोबत सत्तेचा संसार थाटला. आणि जयंत पाटलांचा पवारांसोबतचा प्रवास लांबला. मात्र आता प्रदेशाध्यक्षपदावरुन रोहित पवारांचा जयंत पाटलांसोबत संघर्ष चव्हाट्यावर आलाय.

तर दुसरीकडे जयंत पाटील भाजपात जाण्याची शक्यता असून त्यांचा भाजपला कसा फायदा होणार? पाहूयात. पवारांच्या

▶▶ पान २ वर

# पोलीस समोरून आले जुगारी पाठीमागील दरवाज्यातून पळाले

## परळी तालुक्यातील घटना

परळी, (दिव्य न्युज):- तालुक्यातील धर्मापुरी येथील बस स्थानक रोडवर एका इमारतीमध्ये मोबाईलवर ऑनलाईन कल्याण मुंबई नावाचा जुगार चालू असल्याची खबर पोलिसांना मिळाली. यावरून परळी ग्रामीण पोलिसांच्या एका पथकाने शुक्रवारी रात्रीच्या सुमारास या जुगार अड्ड्यावर छापा टाकला. मात्र, पोलीस आल्याची चाहूल लागल्याने जुगारी पाठीमागील दरवाजातून पसार झाले. तेवढ्यात समोरील दरवाजातून पोलिस दाखल झाले. जुगारी

▶▶ पान २ वर





### मेहुण्यावर तडीपारीची कारवाई होताच जरांगेंचा इशारा

# आंदोलन बंद पाडण्यासाठी फडणवीसांचे हे षडयंत्र

जालना , (दिव्य न्युज):- मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मेहुण्याला चार जिल्ह्यातून तडीपार करण्यात आलं आहे. वाळू तस्करीसह सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी ही कारवाई करण्यात आल्याचं सांगितलं जात आहे.

मात्र, मेहुण्यावर कारवाई होताच जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर हल्लाबोल केला आहे. मेहुण्यासह अंतरवाली सराटीतील आंदोलकांना बजावलेल्या तडीपारीच्या नोटीसवरून जरांगेंनी फडणवीसांवर निशाणा साधला. आंदोलन बंद पाडण्यासाठी नातेवाईक आणि कार्यकर्त्यांना तडीपार करणे हे त्यांचंच षडयंत्र



असल्याचं जरांगे म्हणाले.जालन्यात वाळू माफियांसह अट्टल गुन्हेगारांच्या विरोधात प्रशासनाने कठोर कारवाई केली आहे. त्यानुसार आता ९ आरोपींना जालनासह बीड, परभणी आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांतून तडीपार

▶▶ पान २ वर

# मनोज जरांगेंचा मेहुणा विलास खेडकरसह ९ जणांवर तडीपारीची कारवाई

जालन्यात वाळू माफिया आणि अट्टल गुन्हेगारांच्या विरोधात प्रशासन क्शन मोडवर आले असून, वाळू प्रकरणासह इतर गुन्ह्यातील नऊ आरोपींना जालनासह बीड, परभणी आणि छत्रपती संभाजी नगर या जिल्ह्यातून तडीपार करण्यात आलं आहे. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचा मेहुणा विलास खेडकर याच्यावर देखील तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे.

मनोज जरांगे यांच्या मेहुण्यासह ९

## जालन्यात प्रशासन ॲक्शन मोडवर

वाळू माफिया आणि अटल गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे. अंबड उपविभागीय न्याय दंडाधिकारी यांच्या आदेशाने तडीपारीची कारवाई केली आहे. या आरोपींविरोधात जालन्यातल्या



अंबड, घनसावंगी आणि गोंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे दाखल आहेत, अशी माहितीही समोर आली आहे.

मनोज जरांगे यांच्या आंदोलनामध्ये सक्रिय असणाऱ्या जवळपास सहा आरोपींवरती परभणी, जालना बीड आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातून हद्दपारची कारवाई करण्यात आली आहे.सदर

▶▶ पान २ वर

# अंगणवाडीच्या खिचडीतून विषबाधा; ११ बालकांना उलटीचा त्रास

माजलगाव, (दिव्य न्युज):- तालुक्यातील टाकरवन जवळ असलेल्या फुलसिंग नगर तांडा येथील अंगणवाडीत शनिवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास खिचडी खाल्ल्याने ११ बालकांना विषबाधा झाल्याची घटना घडली. या बालकांवर माजलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

टाकरवन जवळ असलेल्या फुलसिंग नगर तांडा या ठिकाणी असलेल्या अंगणवाडीत २९ बालकी असून त्यापैकी ७ बालके शनिवारी उपस्थित होते. या अंगणवाडीतील मुलांबरोबर शेजारी असलेल्या जिल्हा परिषद शाळेतील काही विद्यार्थी या ठिकाणी खिचडी खाण्यासाठी आले होते. खिचडी खाऊन ही बालके आपापल्या घरी गेली. त्यानंतर दुपारी एक वाजेच्या सुमारास अंगणवाडीतील ७ व ४ जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या बालकांना अचानक मळमळ व उलटीचा त्रास सुरू झाला. अंगणवाडी सेविका कविता राठोड यांनी सरपंच सुनील तर व उपसरपंच दयानंद बोबडे यांना याची माहिती दिली. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मधुकर घुबडे यांना माहिती मिळताच त्यांनी तात्काळ रुग्णवाहिका पाठवून बालकांना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. सर्वांवर उपचार करण्यात आले असून प्रकृती स्थिर असल्याचे डॉ. घुबडे यांनी सांगितले.

अंगणवाडीत शिकणारी श्रावणी नवनाथ राठोड (वय ३ ) संध्या लखन राठोड (वय ५ ), पल्लवी अतुल राठोड (वय ५), प्रीतम रवींद्र राठोड (वय ५ ),देवांश अजय राठोड (वय १८ महिने ) रा. फुलसिंग तांडा त्याचबरोबर आर्यन परमेश्वर राठोड (वय ४ ), आरव परमेश्वर राठोड (वय ३ ) रा. टाकरवन येथील बालके आहेत. त्याचबरोबर जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणारे अक्षर लहू चव्हाण, देवांश अजय राठोड (वय ३ ) रा. वारोळा , इशिता देविदास धनगाव (वय ७ ), प्रथमेश दिलीप पवार (वय ७) व प्रांजल दिलीप पवार(वय ८ ) हे सर्व रा. फुलसिंग तांडा येथील रहिवासी आहेत.

# महादेव मुंडेंच्या हत्येचा तपास एसआयटी किंवा सीआयडी मार्फत करा-ज्ञानेश्वरी मुंडें

परळी, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरण गेल्या काही दिवसापासून चर्चेत आहे. देशमुख यांच्या हत्येला दोन महिने पूर्ण झाली आहेत. तर दुसरीकडे महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणाचा तपास सीआयडी किंवा एसआयटीकडे देण्यात यावा अन्यथा मुख्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचा इशारा ज्ञानेश्वरी मुंडे यांनी पोलिसांकडे केली आहे.



महादेव मुंडे यांची हत्या होऊन १४ महिने उलटले आहेत. पण, तरीही तपास होत नसल्याचा खुलासा झाला आहे.यानंतर आता या प्रकरणाचा तपास परळी पोलिसांकडून काढून अंबाजोगाई पोलीस ठाण्याकडे दिला आहे. आता या प्रकरणाचा तपास एसआयटी किंवा सीआयडीकडे देण्यात यावा अशी मागणी करण्यात येत आहे.

ज्ञानेश्वरी मुंडे म्हणाल्या, 'आमची एवढीच मागणी आहे एसपी साहेबांना, या प्रकरणात तात्काळ एसआयपी आणि सीआयडी द्या. नाहीतर आम्ही पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण करू. याआधीही आम्ही एसपी साहेबांना भेटलो होतो. तेंव्हा तपास अंबाजोगाई पोलीस उपअधीक्षक अनिल चोरमले यांच्याकडे सोपवण्यात आला नव्हता. त्यांच्याकडे कोणत्याच गोष्टीचा फॉलोअप मिळाला नाही. त्यामुळे या प्रकरणात आम्हाला एसआयटी आणि सीआयडी तपास हवा आहे, असंही मुंडे म्हणाल्या. परळी येथील तहसील कार्यालयासमोर सायंकाळी ७.३० ते ८ वाजण्याच्या सुमारास महादेव मुंडे यांची हत्या झाली. १४ महिने उलटूनही आरोपींचा शोध लागलेला नाही. या प्रकरणाच्या तापासात आतापर्यंत चार अधिकारी बदलले आहेत. त्यांच्या कुटुंबीयांना अनेकवेळा पोलिसांकडे मागणी केली पण, अजूनही या प्रकरणाचा तपास लागलेला नाही.

# राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणावर अजित पवारांची निवड;शिंदे गट नाराज

मुंबई, (दिव्य न्युज):- महायुती सरकारमध्ये नेहमीच छोट्या मोठ्या कारणावरून धुसफूस पाहायला मिळते. महायुतीत एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आहेत. पण यातील एक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाराज असल्याची चर्चा सतत सुरू असते. आता पुन्हा एकनाथ शिंदे आणि सोबतच शिंदे गट नाराज झाल्याची चर्चा राजकीय सुरू झाली आहे, कारण राज्य सरकारने राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची पुनर्रचना केली असून यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सदस्य करून घेत एकनाथ शिंदे यांना डावलण्यात आले आहे. ज्याबाबत आता शिंदे गटाकडून अप्रत्यक्षपणे नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.



महायुती सरकारमध्ये भाजपानंतर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची ताकद जास्त आहे. कारण शिंदेंच्या शिवसेनेकडे ५७ आमदारांचे पाठबळ आहे, तर त्याखालोखाल अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ४१ आमदार आहेत. एकनाथ शिंदे हे माजी मुख्यमंत्री आहेत. त्यांचा अनुभव मोठा आहे. त्यामुळे अजित पवारांच्याऐवजी त्यांची प्राधिकरणावर निवड व्हायला हवी होती, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडे नागरी विकास आणि गृहनिर्माण खाते आहे. परंतु, एका अर्थमंत्र्यांची या प्राधिकरणावर निवड करण्यात येत असते, ज्यामुळे एका उपमुख्यमंत्र्याचाच या प्राधिकरणात समावेश करण्यात आल्याचे बोलले जात आहे. महायुती सरकारने गुरुवारी नऊ सदस्यीय प्राधिकरणाची घोषणा केली. यामध्ये राज्याचे मुख्य सचिव हे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.

प्राधिकरणातील इतर सदस्यांमध्ये महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचा समावेश आहे. आबिटकर यांच्या रुपाने शिवसेना शिंदे गटाचे एकच सदस्य आहेत. तर बिगर सरकारी सदस्यांपैकी आयआयटी मुंबईचे प्रा. रवी सिन्हा आणि प्रा. दिपांकर चौधरी आहेत. तर, आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ च्या नियम आणि कायद्यानुसार प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. प्राधिकरणात अर्थखाते सांभाळणाऱ्या एका उपमुख्यमंत्र्यांचा समावेश करण्यात आला आहे. ज्येष्ठतेनुसार सदस्य नेमण्याचा कोणताही नियम नाही. कायद्यातील तरतुदीनुसार अध्यक्ष त्यांच्याव्यतिरिक्त केवळ आठच सदस्यांची नेमणूक प्राधिकरणावर करू शकतात, असे एका मदत आणि पुनर्वसन विभागातील एका अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले आहे.

पान १ वरून

## सेंटर रेल्वेचा ऊर्दुशी

सण आहे ज्या दिवशी बीडच्या स्थानकावर सात ते आठ डब्याची रेल्वे गाडी आली त्या दिवशी तर बीडकरांचा आनंद होता परंतु हे आनंद होत असतांना ही दुसऱ्याकडे मुस्लिम समाजात दुख ही होता की रेल्वेच्या नियमाप्रमाणे जे बोर्ड रेल्वे स्थानकावर लावण्यात येतो त्या बोर्डावर प्रथम इंग्रजीमध्ये नंतर हिंदीमध्ये जे राज्य असेल त्या राज्याची प्रथम भाषा म्हणजे महाराष्ट्रमध्ये मराठी मध्ये आणि त्यानंतर ऊर्दुमध्ये नांव टाकण्यात येतो प्रत्येक बोर्डावर चार भाषेत नाव टाकण्यात आलेले आहे पण सेंट्रल रेल्वे च्या अधिकाऱ्यांनी बीडच्या रेल्वे स्थानकावर लावलेल्या बोर्डवर ऊर्दुमध्ये नाव ना टाकल्याने एकाकडे खुशी रेल्वे आली म्हणून आणि दुसऱ्याकडे नाराजगी बोर्डवर ऊर्दु नाव ना टाकल्याने या वर मुस्लिम समाजात प्रचंड नाराजी असून रेल्वे अधिकाऱ्यांच्या विरूध्द आता मी स्वता तक्रार करणार असल्याची माहिती ही मुसा खान यांनी दिली आहे. देशात मुंबई असो पुणे असो, हेद्राबाद असो, लखनो असो, औरंगाबाद असो, दहरादुन असो, दिल्ली असो, बनारस असो, निहालगड असो, यासह अमेठी असो व तसेच परळी वैजनाथ, उस्मानाबाद, लातुर, सोलापुर, या ठिकाणच्या बोर्डावर ऊर्दु भाषेत नाव टाकण्यात आलेले आहे त्याच प्रमाणे बीडच्या स्थानकावर ऊर्दु मध्ये नाव टाकणयात यावे अशी ही मागणी मुसा खान यांनी केले आहे. बीडचे माजी खासदार व देशाचे लोकप्रिय नेते स्व.गोपीनाथ मुंडे साहेब हे ऊर्दुशी प्रेम करणारे होते त्यांच्याच कार्यकाळात औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठमध्ये ऊर्दु भाषा सुरू करण्यात आली होती तसेच प्रत्येक ठिकाणी ऊर्दु ला न्याय कसा मिळेल यासाठी त्यांच्याकडून प्रयतन करण्यात आले होते. त्याच प्रमाणे आता राज्याचे मंत्री पंकजाताई मुंडे, आणि मा.खा.प्रितमताई मुंडे यांनी ही ऊर्दुशी प्रेम करत बीडच्या रेल्वे स्थानकावर ऊर्दु बोर्ड लावण्यासाठी प्रयत्न करावे यासाठी आम्ही त्यांना भेटून निवेदन ही देणार आहे अशी माहीती मुसा खान यांनी दिली आहे.

## किरण डावकर यांच्या

राजकारणामध्ये सक्रिय झाले आहेत त्यामुळे राजकारण करत असताना २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण हे डोक्यात ठेवून ते काम करत असतात याच माध्यमातून ते अनेक दिवसांपासून समाजासाठी आपलं काहीतरी देणं असतं यासाठी सतत प्रयत्नशील असतात रक्तदान शिबिर असो किंवा हॉस्पिटलचे कुठलेही प्रॉब्लेम आसो सर्वसाधारण कुटुंबाच्या अडचणी मध्ये ते पुढाकार घेऊन या सर्वांना मदत करण्यासाठी अहो रात्री उपस्थित असतात एवढेच नाही तर स्वतःचा वाढदिवस असो किंवा मित्रपरिवार चा वाढदिवस असो इतर खर्च कमी करून गोरगरीब जनतेसाठी व वयोवृद्ध अनाथ मुलांसाठी मदत करण्यासाठी पुढाकार घेऊन सतत प्रयत्नशील असतात.

## बीडमध्ये २०० रिक्षा जप्त

सुभाष सानप, उपनिरीक्षक विजय जाधवर, बजरंग कुटुंबरे, वसुदेव मिसाळ, हवालदार श्रीकांत पाखरे, आजिनाथ बांगर, दत्तात्रय उबाळे, राजभाऊ तांबे राजाभाऊ तांदळे, सचिन सारणीकर, आजिनाथ मुंडे, नितीन शिंदे, वसीम शेख, गोरे, अनिता पवार, हारके, शिवदास घोलप, पवार आदींनी ही कारवाई केली.

# पुण्यातील एनडीए परिसरात आढळली पाकिस्तानी नोट..!

## सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर प्रकार असल्याने खळबळ

पिंपरी , (दिव्य न्युज):- मुळशी तालुक्यातील भुकूम येथे पाकिस्तानी चलनातील नोट आढळली आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे. स्काय आय मानस लेकसिटीमधील आयरिस -३ हाउसिंग सोसायटीत शनिवारी (दि. ८) सकाळी साडेदहा ते अकराच्या दरम्यान हा प्रकार समोर आला. ही सोसायटी नॅशनल डिफेन्स कडमीच्या (एनडीए) हद्दीपासून काही मीटर अंतरावर आहे. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने हा प्रकार गंभीर मानला जात आहे.

हाउसिंग सोसायटीचे अध्यक्ष सहदेव यादव यांनी याबाबत बावधन पोलिस ठाण्यात अर्ज



दिला आहे. यादव हे त्यांच्या सोसायटीतील इतर दोघांसोबत शनिवारी सकाळी साडेदहा ते अकराच्या दरम्यान लिफ्टमधून बाहेर पडले. त्यावेळी त्यांना लिफ्टजवळ एक चलनी नोट दिसून आली. त्या नोटवर स्टेट बँक ऑफ पाकिस्तान असे नमूद असल्याचे दिसून आले. त्यामुळे यादव यांनी पोलिसांकडे धाव घेत अर्ज दिला. तसेच पाकिस्तानी चलनी नोट देखील पोलिसांच्या ताब्यात दिली.

बावधन पोलिसांनी संबंधित सोसायटीत पाहणी केली. सोसायटीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे रेकॉर्डिंग होत नसल्याने सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध होऊ शकले नाहीत. त्यामुळे सोसायटीतील रहिवाशांकडे चौकशी करण्यात येत आहे. तसेच सोसायटीत कोण आले? डिलिव्हरी बॉय आले का? याबाबतही पोलिस माहिती घेत आहेत.

पान १ वरून

## लोकसहभागाच्या

पठाण, जावेद शेख यांनी उपचारासाठी लोकसहभागाचे आवाहन केले असता आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळत असुन बीड जिल्ह्यासह विविध ठिकाणच्या दानशूरांनी आत्तापर्यंत १ लाख ३५ हजारांची मदत केली असून अजुनही मदतीचा ओघ सुरू आहे.

सायमा ही ९ वर्षांपासून अंथरुणातच असल्याने शरीरावर याचे दुष्परिणाम झाल्याने काही भागावर जखमा झाल्या आहेत त्यामुळे तिच्यावर करण्यात येणाऱ्या उपचाराला बांधा येत असून सध्या त्या जखमावरच उपचार होत असून लवकर जखमा बऱ्या झाल्या नाही तर तेथेही सर्जरी करावी लागणार असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.एकुणच लोकसहभागातून मुलीवर उपचार होत असुन लोकही त्याला भरभरून प्रतिसाद देत असल्याने लोकसहभागाच्या काठीचा आधार घेत सायमा एक-एक पाऊल पुढे टाकत आहे..

कुटुंबाला धीर देत उपचाराचा आढावा घेतला

घटनेची गंभीरता पाहुन मा.जि.प.अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला यांनी सय्यद शफाउद्दीन, पत्रकार जावेद शेख यांच्यासह सायमा बेग कुटुंबाची यांची भेट घेतली तसेच आम्ही सर्व आपल्या सोबत आहोत असा धीर देत संचेती हॉटेलचे प्रमुख मा.डॉ.पराग संचेती यांच्याशी संवाद साधत उपचाराचा आढावा घेतला

उपचाराअभावी अंपगत्व येणं ही दुर्दैवी बाब-सय्यद अब्दुल्ला

उपचाराअभावी अंपगत्व येणं ही दुर्दैवी बाब असुन बेग कुटुंबाने घटनेची वाच्यता लवकर जाहीर केली असती तर सायमा ९ वर्षे संघर्ष करावा लागला नसता तरी जी मदत बेग कुटुंबाला लागेल ती करू

## बेपत्ता ट्रकचालकाचा

कर्नाटक) या ट्रकचालकाचा शनिवारी सायंकाळी शरीरावर अनेक ठिकाणी जखमा झालेल्या अवस्थेत मृतदेह आढळला.

मांजरसुंभाजवळील वानगाव फाट्याजवळ तीन दिवसांपासून एक ट्रक उभा उभा होता. येथील लोकांनी त्या गाडीच्या ट्रान्सपोर्ट ऑफिसला फोन करून गाडीची माहिती दिली. ट्रान्सपोर्ट ऑफिसवरून चालक मोहम्मद सलीम यांच्या नातेवाइकांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर त्यांच्या नातेवाइकांनी वानगाव येथे येऊन हद्दीतील नेकनूर पोलिस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार शुक्रवारी नोंदवली होती. त्यानंतर शनिवारी सायंकाळच्या सुमारास मांजरसुभा परिसरातील भारत रसाळ यांच्या शेतात चालक मोहम्मद सलीम याचा मृतदेह आढळला.

## सोयाबीन उत्पादक

आहे. याबाबत लेखी पत्रही आ.क्षीरसागर यांनी दिले आहे.

सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर अन् त्यांच्या संवादातून लक्षात आलेल्या समस्या लक्षात घेवून आ.संदीप क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांच्या भावना पत्र लिहून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यापयंत पोहचवल्या आहेत. हंगाम २०२४-२५ मधील हमीभावाने सोयाबीन खरेदीला मुदतवाढ दिल्यास सर्व शेतकऱ्यांकडील सोयाबीन खरेदी होवू शकते याकडे लक्ष वेधत आ.संदीप क्षीरसागर यांनी याबाबतच्या पत्रात नमूद केले आहे की, केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र शासनाच्या संदर्भीय धोरणानुसार सुरूवातीला दि.३१ जानेवारी २०२५ पर्यंत त्यानंतर दि.६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सोयाबीन खरेदीच्या बाबतीत मुदतवाढ देण्यात आली होती; परंतु बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील नोंदणीधारक शेतकरी ४४ हजार ७०० च्या वर आहेत. त्यापैकी दि.६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत किमान २१ हजार शेतकरी बांधवांककडून सोयाबीन खरेदी झालेली आहे.

बीड मतदार संघासह जिल्ह्यातील किमान ४० टक्क्याच्यावर शेतकरी बांधवांची खरेदी अजूनही शिल्लक आहे. त्यामुळेच या सर्व शेतकरी बांधवांच्या सोयाबीनची खरेदी करण्यासाठी मुदतवाढ द्यावी व त्यातून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी महत्वाची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. निवेदनातच्या प्रती राज्याचे मुख्य सचिव व अवर सचिवांनाही पाठवण्यात आल्या आहेत. आ.संदीप क्षीरसागर यांनी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न राज्य शासनापर्यंत पोहचवले आहेत. आता शासनाकडून मुदतवाढीचा निर्णय कधी होतो याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून आहे.

## कृष्णा आंधळे

देशमुख हत्या प्रकरणाचा तपास पोलिसांकडून योग्य पद्धतीने सुरु आहे. मात्र, कृष्णा आंधळे हा पोलिसांच्या कामगिरीला लागलेला कलंक आहे. आंधळे छत्रपती संभाजीनगर येथे पोलिस भरतीची तयारी करत होता. मात्र, त्यानतंर तो गुन्हेगारीकडे वळला. तो सायको झाला होता. त्याला आपल्या आई-वडीलांशी देखील काही देणेघेणं नव्हतं. शिवाय तो अनेक गुन्ह्यात फरार होता. आतादेखील तो राज्याबाहेर लपून बसला असेल. शिवाय तो नामचीन गुंड नाही त्यामुळे कधीतरी पकडला जाईलच. आमचा पोलिसांवर पूर्ण विश्वास असून सरपंच देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी होत नाही तोपर्यंत शांत बसणार नाही, असंही धस म्हणाले.तर यावेळी धसांनी वाल्मिक कराड आणि त्याच्या सहकऱ्यांमुळे परळीतील ५०० व्यापारी शहर सोडून गेल्याचा गंभीर आरोप केला. शिवाय आता कराडला अटक झाल्यामुळे व्यापाऱ्यांनी सुटकेचा निश्वास सोडला असून आजकाल परळीत दादागिरी चालत नाही, असंही त्यांनी सांगितलं.

चाटेने मोबाईल धरणात फेकला...

दरम्यान, धस यांनी विष्णू चाटे याच्याबाबतही मोठा दावा केला आहे. विष्णू चाटे संतोष देशमुखांच्या हत्येनंतर नाशिकमध्ये आला. यावेळी त्याने त्याचा मोबाईल बंद केला आणि गंगापूरच्या धरणात फेकून दिला. त्यानंतर तो पोलिसांना शरण गेला, असा मोठा दावा धस यांनी केला. शिवाय चाटेने मोबाईल फेकून दिला असला तरी तपासा अडथळा येणार नाही. कारण कंपनीला सांगून फेकलेल्या मोबाईलमधील सर्व डेटा रिकव्हर करता येईल, असं वक्तव्य धस यांनी केलं.

## जयंत पाटील

राष्ट्रवादीत होणारी पक्षांतर्गत कोंडी आणि प्रदेशाध्यक्ष पदावरुन हटवण्याची होत असलेल्या मागणीमुळे जयंत पाटील सत्तेच्या आश्रयाला जाण्याची शक्यता वर्तवली जातेय. त्याचीच पहिली वीट गडकरींच्या उपस्थितीत रचण्याचा तर्क वर्तवला जातोय.. मात्र जयंत पाटील सत्तेत सहभागी होऊन मंत्री बनणार की पवारांसोबत निष्ठा कायम ठेवणार? याकडे लक्ष लागलंय.

## विधान परिषदेच्या ३३%

सदस्य म्हणून विधान परिषदेवर आधीच पाठविण्यात आले आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी ऑक्टोबर २०२४ मध्ये त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. राज्यपाल नियुक्त आमदारांची एकूण संख्या १२ असते. पाच जागा अजूनही रिक्त आहेत आणि त्या लगेच भरण्यासाठी महायुतीमध्ये सध्या कोणत्याही हालचाली दिसत नाहीत. भविष्यात या पाच जागा भरताना भाजपला तीन आणि अन्य दोन मित्रपक्षांना प्रत्येकी एक अशा जागा दिल्या जाण्याची शक्यता आहे.

सदस्यांतून आमदार निवडून पाठविण्याचाही खोळंबा

राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून मुंबईत सुरू होत असून, या अधिवेशनातही विधान परिषदेचे संख्याबळ हे एकूण संख्येच्या दोन तृतियांश इतकेच असेल. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांमधून विधान परिषदेवर निवडून द्यावयाच्या २२ पैकी तब्बल १६ जागा सध्या रिक्त आहेत. जवळपास तीन वर्षांपासून बहुतेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ शकलेल्या नाहीत. त्यामुळे त्यांच्या सदस्यांमधून विधान परिषदेवर आमदार निवडून पाठविण्याची प्रक्रिया खोळंबली आहे. या निवडणुका झाल्यानंतरच विधान परिषदेवर सदस्य निवडून देण्यासाठीची निवडणूक होईल.

## पोलिस समोरून

हाती लागले नाही, पण पोलिसांनी यावेळी तीन लाख २३ हजार रुपये ८० रुपये किमतीचे जुगार साहित्य व रोख रक्कम जप्त केली आहे. याप्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात ८ फेब्रुवारी रोजी पहाटे जगन्नाथ फड ,शिवाजी पांचाळ, अक्षय सावंत ( राहणार धर्मापुरी ) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवारी दुपारपर्यंत यातील एकाही आरोपीस अटक करण्यात आली नव्हती.

याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी; धर्मापुरी येथील बस स्थानकाजवळ एका इमारतीमध्ये मुंबई -कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेलविला जात असल्याची खबर पोलिसांना मिळाली. त्यावरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार पोलीस उपनिरीक्षक रियाज शेखलाल, निमोणे व पोलीस हेड कॉन्स्टेबल पांडुरंग वाले ,पोलीस कर्मचारी चेमटे, वाहन चालक महादेव वाघमारे व इतर कर्मचाऱ्यांनी सात फेब्रुवारी रात्री सव्वानऊ वाजेच्या सुमारास जुगार अड्ड्यावर छापा टाकला. मात्र, पोलीस पथक आल्याचे समजताच जुगार चालक आणि जुगारी पाठीमागील दरवाज्यातून उड्या टाकून पळून गेले. त्यामुळे एकही आरोपी पोलिसांच्या हाती लागला नाही.

दरम्यान, पोलिसांनी मटका जुगाराचे साहित्य व दोन प्रिंटर, एक लॅपटॉप ,रोल्स मशीन एलईडी टीव्ही, वाय-फाय राऊटर ११ खुर्च्या, तीन टॅब दोन मोबाईल असा एकूण तीन लाख २३ हजार रुपयाचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार हे करीत आहेत. परळी तालुक्यातील धर्मापुरी येथे गेला काही दिवसापासून जुगार चालू होता. शुक्रवारच्या कारवाईमुळे अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहे.

## फडणवीसांचे हे षडयंत्र

करण्यात आलं आहे. तडीपार करण्यात आलेल्या नऊ जणांमध्ये मनोज जरांगे पाटलांचा मेहुणा विलास खेडकर याचा देखील समावेश आहे.

तडीपारीची कारवाई केलेल्यांवर अंतरवाली सराटीच्या आंदोलनात केलेली जाळपोळ, सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल आहे. विलास हरिभाऊ खेडकर, केशव माधव वायभट, संयोग मधुकर सोळुंके, अमोल केशव पंडित, गोरख बबनराव कुरणकर, गजानन गणपत सोळुंके, संदीप सुखदेव लोहकरे, रामदास मसूरराव तौर, वामन मसुरराव तौर यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.

आंदोलकांसह मेहुण्यावर तडीपारीची कारवाई करताच यावर मनोज जरांगे पाटलांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, माझं तोंड बंद करण्यासाठी मुद्दाम माझ्या नातेवाईकांवर आणि कार्यकर्त्यांची नावे तडीपारीच्या यादीत घालण्यात येत आहेत.१०० टक्के हे देवेंद्र फडणवीसांचं षडयंत्र आहे. मात्र, चुकीचं काम केलं तर माझ्या बापावर जरी केस झाली तरी मी सोडणार नाही. पाहुण्यांचा तर विषय संपला. मात्र, फडणवीसांनी आमच्याशी गद्दारी केली. गुन्हे मागे घेतो म्हणाले आणि आता खोट्या गुन्ह्यात लोकांना अडकवत असल्याचा आरोप जरांगेंनी यावेळी केला. तसंच गोड बोलून आम्हाला अडकवत असाल तर मराठ्यांची पोरं तुम्हाला राज्यात रस्त्याने फिरू देणार नाहीत, असा इशाराही त्यांनी यावेळी फडणवीसांना दिला.

## मनोज जरांगेंचा मेहुणा

संभाजीनगर या जिल्ह्यातून हद्दपारची कारवाई करण्यात आली आहे.सदर आरोपींवरती वाळू चोरी, जीवे मारण्याचा प्रयत्न, अंतरवाली सराटीच्या आंदोलनात केलेली जाळपोळ यासह सरकारी कामात अडथळा आणण्याचे जालना जिल्ह्यात गुन्हे दाखल आहेत. २०१९ पासून वेगवेगळ्या प्रकरणात हे गुन्हे दाखल आहेत. अंबड उपविभागीय न्यायदंडाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये ही तडीपारीची कारवाई करण्यात आली असून आणखीही कारवाईचे प्रस्ताव विचाराधीन असल्याची देखील माहिती मिळत आहे.

यांच्यावर झालीय तडीपारीची कारवाई

१) विलास हरिभाऊ खेडकर, २) केशव माधव वायभट, ३) संयोग मधुकर सोळुंके, ४) गजानन गणपत सोळुंके, ५) अमोल केशव पंडित, ६) गोरख बबनराव कुरणकर, ७) संदीप सुखदेव लोहकरे, ८) रामदास मसूरराव तौर ९) वामन मसुरराव तौर .